दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | L&T SWITCHGEAR | INDOASIAN | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर | वर्ष ४ थे | अंक ६६ वा शुक्रवार दि.०९ ऑगस्ट २०२४ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.


# वक्फ सुधारणा विधेयक अखेर लोकसभेत सादर

नवी दिल्ली : वृत्तसंस्था गेल्या काही दिवसांपासून देशात वक्फ बोर्डाची खूप चर्चा सुरू आहे. केंद्र सरकार या वक्फ बोर्डाच्या कायद्यात सुधारणा करणार असल्याचे बोलले जात होते. त्यानुसार, आज (दि.८) संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करण्यासाठी वक्फ (सुधारणा) विधेयक २०२४ लोकसभेत सादर केले. या विधेयकाला नितीश कुमारांच्या जेडीयूने पाठिंबा दर्शवला आहे, पण काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि 'एमआयएम'सह सर्व विरोधी पक्षांना या विधेयकाला संविधानविरोधी म्हणत विरोध केला आहे. मुस्लिमविरोधी नाही– लालन सिंहजेडीयू नेते आणि केंद्रीय मंत्री लालन सिंह यांनी संसदेत वक्फ विधेयकाचे समर्थन केले आहे. लालन सिंह यांनी विरोधकांवर टीका करत हे विधेयक मुस्लिमविरोधी नसल्याचे म्हटले आहे. विरोधक मंदिराबद्दल बोलत आहेत, इथे मंदिराची चर्चा कुठून आली? मुळात कोणतीही संस्था निरंकुश झाली की, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि पारदर्शकतेसाठी सरकार कायदे करत असते. हा सरकारचा हक्क आहे. हे विधेयक पारदर्शकतेसाठी आहे. ज्यांनी शिखांची हत्या केली, ते आज अल्पसंख्याकांबद्दल बोलत आहेत. या विधेयकात मशिदीबाबत कोणतीही छेडछाड केलेली नाही. वक्फ बोर्डात पारदर्शकता आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

शिवसेनेचा पाठिंबा : शिवसेना (शिंदे गट) खासदार श्रीकांत शिंदे यांनी वक्फ विधेयकाचे समर्थन केले आहे. ते म्हणाले की, काही लोक जाती–धर्माच्या नावाखाली या विधेयकाला विरोध करत आहेत. या विधेयकाचा उद्देश पारदर्शकता आणि जबाबदारी आहे. या विधेयकाच्या नावाखाली विरोधी पक्ष गोंधळ घालण्याचा प्रयत्न करत आहेत. या देशात वेगळा कायदा का हवा आहे? महाराष्ट्रात त्यांचे सरकार असताना शिर्डी व इतर मंदिरांबाबत समिती स्थापन करण्याचे काम झाले, तेव्हा त्यांना सर्वधर्मसमभाव आठवला नाही. काँग्रेसचा विधेयकाला विरोध : हे विधेयक म्हणजे संविधानावर मूलभूत हल्ला आहे. या विधेयकाद्वारे गैरमुस्लिमांनाही वक्फ गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य असावेत, अशी तरतूद करत आहेत. हा थेट धर्मस्वातंत्र्यावर हल्ला आहे. पुढे तुम्ही या विधेयकाच्या माध्यमातून ख्रिश्चन, जैन, विविध धर्मात ढवळाढवळ कराल. भारतातील लोक आता अशा प्रकारचे फूट पाडणारे राजकारण सहन करणार नाहीत. आम्ही देखील हिंदू आहोत, पण इतर धर्मीयांच्या श्रद्धेचा आदर करतो. हे विधेयक महाराष्ट्र आणि हरियाणा निवडणुकीसाठी आणले जात आहे. लोकसभेत जनतेने तुम्हाला धडा शिकवला, हे तुम्हाला अजून समजलेले नाही, अशी टीका काँग्रेस खासदार केसी वेणूगोपाल यांनी केली. ओवेसींचा सरकारवर घणाघात : एमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी नियम ७२ (२) अंतर्गत विधेयक मांडण्यास विरोध केला आणि



ते म्हणाले की, हे संविधानाच्या मूळ आत्म्यावर हल्ला आहे. वक्फ विधेयक चर्चेविना आणले आहे. हिंदू आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या नावे संपूर्ण मालमत्ता देऊ शकतात, पण आम्ही फक्त एक तृतीयांश देऊ शकतो. हिंदू संघटना आणि गुरुद्वारा व्यवस्थापन समितीमध्ये इतर धर्माच्या सदस्यांचा समावेश नसेल, तर वक्फमध्ये का? हे विधेयक हिंदू आणि मुस्लिमांमध्ये भेदभाव करणारे आहे. वक्फ मालमत्ता सार्वजनिक मालमत्ता नाही. या सरकारला दर्गा आणि इतर मालमत्ता बळकवायच्या आहेत. मुस्लिमांची संपत्ती हिसकावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तुम्ही देशाचे विभाजन करण्याचे काम करत आहात, तुम्ही मुस्लिमांचे शत्रू आहात, अशी घणाघाती टीका ओवेसींनी केली.

# निलंगा मतदारसंघाचा मानसन्मान वाढविण्याचे काम केले आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचा संवाद दौरा

निलंगा/प्रतिनिधी :- गत २० वर्षापासून राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना प्रत्येक नागरिकाशी सुसंवाद साधत त्यांना आपल्या परिवाराचे सदस्य म्हणूनच मान दिलेला आहे. त्याच बरोबर निलंगा मतदारसंघाचा मान सन्मान वाढेल, असे कार्य केलेले असून या माध्यमातून मतदारसंघातील प्रत्येकाचा स्वाभिमान उंचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. आगामी काळातही मतदार संघाचा मानसन्मान वाढेल, असेच कार्य होईल. असा विश्वास देवून याकरिता मतदारसंघातील नागरिकांचा आशिर्वाद माझ्या पाठिशी असावा, असे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे. निलंगा मतदारसंघाअंतर्गत वडगाव, दगडवाडी व निटूर येथे जिल्हा परिषद मतदारसंघ निहाय आयोजित केलेल्या संवाद बैठकीत आ. निलंगेकर बोलत होते. यावेळी जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, विधानसभा प्रभारी दगडू साळुंके, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, मंगेश पाटील, बाजार समितीचे सभापती बाळासाहेब देशमुख, उपसभापती लालासाहेब देशमुख, माजी जि. प. सदस्य व्यंकट धुमाळ, धोंडीराम बिराजदार, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शेषेराव ममाळे, अरविंद पाटील





जाजनुरकर, उत्तम लासुणे, स्वानंद धुमाळ, धोंडिराम सांगवे, गोविंद चिलकुरे, ज्ञानेश्वर चेवले, पंकज रक्षाळे, संतोष शेटे, माधव पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. निलंगा भूमीने आपल्याला स्वाभिमान शिकविलेला असून या स्वाभिमानाला ठेच न पोहोचविता निलंगा मतदारसंघाचा मान आणि सन्मान वाढविण्याचे काम केले असल्याचे सांगून आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मतदारसंघातील प्रत्येकांशी सुसंवाद साधून त्यांना आपल्या परिवाराचा सदस्य म्हणूनच सोबत घेतलेले आहे. निलंगा मतदारसंघाच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सातत्याने कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून या निधीचा वाटा मतदारसंघातील प्रत्येक गावाला पोहोचविण्याचे काम प्रामाणिकपणे केले असल्याचे सांगितले. मात्र, मधल्या काळात म्हणजेच महाविकास आघाडी सरकारच्या काळात निलंगा मतदारसंघावर जाणिवपूर्वक अन्याय करण्याचे काम सत्ताधाजयांनी केले होते. कारण की, जिल्ह्याच्या वर्चस्वासाठी त्यांना निलंगेकरांवर मात करायची आहे.मात्र, आपला स्वाभिमान कायम ठेवत त्यांना वेळोवेळी ठोस उत्तर देण्याचे काम मतदारसंघातील नागरिकांच्या आशिर्वादाने केले असल्याचेही यावेळी आ. निलंगेकर यांनी आवर्जुन सांगितले. लोकसभा निवडणूकीत जातीपातीचे राजकारण करत विरोधकांनी दिशाभूल करण्याचे काम केले आहे, असा आरोप करून या राजकारणाला आणि विरोधकांच्या भूलथापांना आता मतदारसंघातील जनता बळी पडणार नाही, असा विश्वास आ. निलंगेकर यांनी व्यक्त केला. कारण की आता आगामी होणारी लढाई मतदारसंघाच्या मान–सन्मान व स्वाभिमानाची असून या लढाईत मतदारसंघातील प्रत्येक नागरिकांनी मान–सन्मानासाठी माझ्या पाठिशी खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन केले. या बैठकींना जिल्हा परिषद मतदारसंघातील पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या बैठकीच्या माध्यमातून उपस्थितांनी आम्ही तुमच्या पाठिशी आहोत, असा विश्वासही आ. निलंगेकर यांना दिला आहे.

# पोहरेगावात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन; विलासराव देशमुख साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आठवडाभर सुरू राहणार शिबिर

लातूर/प्रतिनिधी माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन करण्यात आले. पोहरेगाव येथे १४ ऑगस्ट पर्यंत शिबिर सुरू राहणार असून याच्या उद्घाटन सोहळ्यास माजी आमदार त्र्यंबक भिसे, सर्जे राव मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच व्ही वडगावे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीधर पाठक, गटविकास अधिकारी सुमित जाधव, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. कुलकर्णी, डॉ. भालचंद्र चाकूरकर, लालासाहेब चव्हाण, अनंतराव देशमुख, प्रमोद जाधव, अनुप शेळके, उमाकांत खलंग्रे, रमेश सूर्यवंशी, शेषराव हाके पाटील, उद्धव चेपट, तानाजी कांबळे, नागनाथ कराड, आशादुल्ला सय्यद, शिरीष यादव, सरपंच ज्योती मोरे, दत्तात्रय सरवदे, शालीवाहन सरवदे, विश्वनाथ कागले, प्रकाश सूर्यवंशी, प्रमोद कापसे आदीसह परिसरातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.





ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक मजबूत झाल्या पाहिजेत. आरोग्य केंद्रात सर्व सोयी सुविधा असाव्यात. तत्पर आणि घरपोच आरोग्यसेवांची एक साखळी तयार झाली पाहिजे. प्राथमिक आरोग्य केंद्र व गावागावात सर्व आरोग्य सोयी उपलब्ध करण्यासाठी नव्याने आराखडा तयार करण्याची गरज आहे. यासाठी नियमांत शिथीलता आणण्याची गरज आहे, यासाठीची व्यवस्था आपण येणाऱ्या काळात निर्माण करू, असे आ. धिरज देशमुख यांनी सांगितले. लोकनेते विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री असताना लातूरसारख्या ठिकाणी त्यांनी बॅरेजची शृंखला तयार केली. या भागाची भौगोलिक परिस्थिती, गरज लक्षात घेऊन नव्या योजनांची आखणी करून त्याची अंमलबजावणी केली. यात विकासाचा दृष्टीकोन आहे. हाच दृष्टीकोन घेऊन यापुढेही जनतेच्या खांद्याला खांदा लावून काम करू, असे आ. धिरज देशमुख यांनी यावेळी सांगितले.

# जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघात भाजपाच्या विजयासाठी जिद्दीने कामाला लागा - आ. रमेशआप्पा कराड यांचे कार्यकर्त्यांना आव्हान

लातूर : – लातूर जिल्ह्यात भाजपाची संघटनात्मक ताकद असून कार्यकर्त्यांची मजबूत फळी असल्याने भाजपा जिल्हा नेतृत्वाने जिल्ह्यातील सहाही विधानसभा लढवण्याचा निर्णय घेतला असल्याने येत्या काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जिद्दीने, जोमाने कामाला लागावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर शहर आणि ग्रामीण जिल्हा भाजपा अधिवेशनात बोलताना पदाधिकारी, कार्यकर्त्यांना केले.

लातूर जिल्हा शहर आणि ग्रामीण भाजपाचे आता लक्ष विधानसभाया अनुषंगाने जिल्हास्तरीय अधिवेशन लातूर येथील पार्वती मंगल कार्यालयात मंगळवारी पार पडले या अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड बोलत होते. या अधिवेशनास माजी पालकमंत्री आ संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी आमदार गोविंदांना केंद्रे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, बब्रुवान खंदाडे, माजी खासदार सुनील गायकवाड, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके, प्रेरणाताई होनराव, जिपचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, विक्रमकाका शिंदे, संतोषआप्पा मुक्ता, भारत चामे, तुकाराम गोरे, संजय दोरवे, गुरुनाथ मग्गे, दिग्विजय काथवटे, शिरीष कुलकर्णी, बापूराव राठोड, उत्तरा कलबुर्गे, रागिनीताई यादव, अमोल निडवदे, गणेश गोमसाळे, प्रवीण सावंत यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व्यासपीठावर होते. या अधिवेशनास जिल्हाभरातील भाजपासह विविध आघाडी आणि मोर्च्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित यश मिळाले नाही संविधान, मराठा आरक्षण, मुस्लिम समाजात संभ्रम यासह अनेक कारणे होती. विरोधकांच्या अपप्रचाराचे समाधान करू शकलो नाहीत. महायुतीच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांनीही काम केले नाही. केवळ मोदी हटाव हेच देशभर राजकारण झाले तरीही तिसऱ्यांदा मोदीजींनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली.







लातूर जिल्ह्यात भाजपाची मजबूत संघटनात्मक ताकद आहे त्यामुळे जिल्ह्यातील सहाही विधानसभा लढवण्याचा जिल्हा भाजपा नेतृत्वाने निर्णय घेतला असून प्रदेश भाजपाला कळविले आहे. प्रदेश नेतृत्व निश्चितपणे योग्य तो निर्णय घेईल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाने विकास कामांना मोठ्या प्रमाणात मान्यता दिली. अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत या सर्व योजना पुढे कायम चालू ठेवण्यासाठी राज्यात पुन्हा भाजपाचे सरकार आले पाहिजे. तेव्हा भाजपाच्या सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधीं आणि कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरापर्यंत जाऊन तळागाळापर्यंत पोहोचून योजनाची जाणीव करून द्यावी आणि सर्वच्या सर्व सहाही विधानसभेत भाजपाचा विजय करण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन केले.

संपूर्ण महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण खराब करण्याचे आणि समाजा– समाजात वाद लावण्याचे काम शरद पवार यांनी केले असल्याचे सांगून राजकीय ठरावावर बोलताना माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, शंभर टक्के जाहीरनामा पूर्ण करणारे केंद्रातील मोदी यांचे सरकार आहे ग्रामीण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने राज्यातही पुन्हा निवडून येणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी असे आवाहन करून लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा कमळाच्या चिन्हावर लढू आणि कार्यकर्त्यांच्या हीमतीवर निश्चितपणे जिंकून आणू असे बोलून दाखविले.

या मेळाव्यात गोविंदअण्णा केंद्रे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, गणेशदादा हाके, सुनील गायकवाड, दिलीपराव देशमुख, ॲड. संभाजीराव पाटील यांच्यासह अनेकांनी विविध ठराव मांडताना विधानसभा निवडणुक अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण सावंत यांनी केले तर शेवटी भारत चामे यांनी आभार मानले.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर :- राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे शुक्रवार, ९ ऑगस्ट, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे ९ ऑगस्ट रोजी नांदेड येथून सकाळी १०.३० वाजता उदगीर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. सकाळी ११ वाजता उदगीर शहरातील लिंबोटी प्रकल्प उदभव जलशुध्दीकरण केंद्र इमारत येथे उदगीर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा शुभारंभ कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. त्यानंतर उदगीर येथून मोटारीने जळकोटकडे प्रयाण करतील दुपारी २ वाजता जळकोट तालुक्यातील घोणसी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र भूमिपूजन समारंभास उपस्थित राहतील व सोयीनुसार जळकोट येथून मोटारीने लातूरकडे प्रयाण करतील.



**संपादकीय....**

# वन नेशन, वन गोल्ड रेट

'एक देश एक दर' धोरण नेमकं काय आहे? ते देशासाठी किती महत्त्वाचं आहे, या संकल्पनेचे परिणाम काय होतील, या दृष्टिकोनातून घेतलेला आढावा.सोन्याच्या विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी जेम्स अँड ज्वेलरी काउन्सिल देशभरात 'एक देश एक दर' (वन नेशन, वन गोल्ड रेट) धोरणावर काम करत आहे. सप्टेंबरमध्ये होणार्या बैठकीनंतर या धोरणाची अधिकृत घोषणा केली जाऊ शकते. भारताच्या 'वन नेशन, वन गोल्ड रेट' (ओएनओआर) धोरणाचे मुख्य उद्दिष्ट देशभरातील सोन्याचे दर प्रमाणित करणं, अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षतेसाठी प्रादेशिक अडथळे दूर करणे आहे. 'ओएनओआर' धोरणाचे उद्दिष्ट देशभरात सोन्याचा एकसमान दर प्रस्थापित करणे आहे.त्यामुळे स्थानिक कर आणि बाजार परिस्थितीतील फरकांमुळे निर्माण होणारी प्रादेशिक असमानता दूर होईल. सध्या, विविध कर संरचना आणि स्थानिक मागणी-पुरवठ्यातील चढउतारांमुळे भारतातील सोन्याच्या किमती विविध राज्यांमध्ये लक्षणीयरीत्या चढ-उतार होऊ शकतात. यामुळे अनेकदा खरेदीदार आणि विक्रेते दोघांसाठी गोंधळ व गैरसोय होते.सोने खरेदी हा भारतीयांसाठी विशेषत: महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा विषय असतो. सणाबरोबरच विविध आनंदाच्या प्रसंगी सोन्याचे अलंकार परिधान केले जातात. त्यामुळे भारतात सोने खरेदीचे प्रमाण लक्षणीय आहे. कर, वाहतूक खर्च, स्थानिक मागणी आणि सरकारी धोरणांसह अनेक कारणांमुळे सोन्याची किंमत राज्यांनुसार बदलते. कमी कर आणि मोठ्या बाजारातील स्पर्धा असलेल्या राज्यांमध्ये उच्च कर आणि मर्यादित बाजारातील स्पर्धा असलेल्या राज्यांपेक्षा सोन्याच्या किमती कमी आहेत. सोन्याच्या विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी राज्यांमध्ये 'वन नेशन, वन गोल्ड रेट' धोरण लागू करण्याच्या उद्देशाने ज्वेलरी उद्योग एकत्र आलाय.यामुळे देशाच्या कोणत्याही कानाकोपर्यातून एकाच दराने सोन्याची विक्री केली जाईल. इंडियन ज्वेलर्स अँड बुलियन असोसिएशन ऑफ इंडिया व ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक काउन्सिल या दोन्ही प्रमुख संघटनांनी याबाबत चर्चा, विचारविनिमय करून ही मागणी केली आहे. भारत जगातील दुसर्या क्रमांकाचा सोन्याचा सर्वात मोठा ग्राहक आहे. दरवर्षी साधारणपणे ८०० टन सोन्याची मागणी संपूर्ण भारतातून असते. या सोन्याचा अधिकृत दर कसा ठरवला जातो किंवा त्याची कशाशी तुलना करावी याबाबत ग्राहकवर्ग मात्र अनभिज्ञ असतो.सोने दराची राज्यनिहाय स्थिती सध्या भारतातील सोन्याचा दर हा अमेरिकन डॉलरवर अवलंबून आहे. डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया वधारला किंवा घसरला तर आपल्याकडे सोन्याचे भाव कमी-जास्त होत राहतात. त्याचबरोबर देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्येही सोन्याच्या किमती बदलतात. महाराष्ट्र, केरळ, राजस्थान किंवा इतर कोणत्याही राज्यात सोन्याचा भाव पाहिला तर सर्वत्र किमती वेगवेगळ्या असताल. प्रत्येक शहरातील स्थानिक बाजारपेठेतील परिस्थिती हा याचा सर्वात मोठा घटक आहे. सोन्याची मागणी आणि पुरवठा तसंच इतर स्थानिक आर्थिक घटकदेखील सोन्याचे दर ठरवण्यात भूमिका बजावतात. याव्यतिरिक्त, प्रत्येक शहरात सोनार आणि ज्वेलर्स यांचे दरही वेगवेगळे असल्याचे दिसून येते. ते त्यांच्या कारागिरीसाठी वेगवेगळे शुल्क आकारू शकतात. सध्या सोन्याचा २४ कॅरेट सोन्याचा दर दहा ग्रॅमसाठी ७० हजार रुपयांच्या घरात आहे. राजधानीतील याच सोन्याचा दर ६९ हजार ८७० रुपये आहे, तर चेन्नईमध्ये हीच किंमत ७० हजार २०० रुपये आहे. पुण्या-मुंबईमध्येसुद्धा दररोजच्या सोन्याच्या दरामध्ये चांगलाच फरक पडतो. संसदेमध्ये सादर झालेल्या अंदाजपत्रकात सोन्यावरील आयात शुल्क कमी केल्यामुळे त्याचा भाव झटक्यात खाली आलेला आहे. अलीकडे सोन्याच्या दरातील हेलकावे खूप लक्षणीय आहेत. लग्नाचा हंगाम लवकर सुरू होणार असल्यामुळे या मागणीत सातत्याने वाढ होत असून मागणी वाढली की निश्चितच दरामध्ये वाढ होणे हे अपरिहार्य आहे. येत्या दिवाळीपर्यंत सोन्याचे दर पुन्हा वर जातील असा जाणकारांचा अंदाज आहे. ट्रान्सपोर्टेशन कॉस्ट : भारत हा सोन्याच्या मोठ्या आयातदारांपैकी एक आहे. सोन्याचा वाहतूक खर्च जास्त असून वाहतूक खर्चामध्ये इंधन, वाहनं, सुरक्षा इत्यादीचा समावेश होतो. तसंच तुम्ही सोनं घेत असलेल्या राज्य किंवा शहरानुसार वाहतुकीचा खर्च बदलू शकतो. सोन्याचे प्रकार : सोने २४ कॅरेट, २२ कॅरेट, १८ कॅरेट आणि १४ कॅरेटचे असते. कॅरेट जितके जास्त असेल तितके सोने शुद्ध आणि त्याचे मूल्यही जास्त असेल. वन नेशन, वन गोल्ड रेटचे फायदे जेव्हा सोन्याच्या किमती प्रमाणित केल्या जातात, तेव्हा प्रादेशिक किमतीतील फरकांमुळे अधिक पैसे देण्याची चिंता न करता ग्राहक खरेदीचे निर्णय घेऊ शकतात. ग्राहकांना एक विश्वासार्ह मालमत्ता म्हणून सोन्यात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन मिळेल. देशभरात धोरणाची अंमलबजावणी झाल्यास भारताच्या सुवर्ण उद्योगालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. पारदर्शक आणि वाजवी किंमत प्रणालीमुळे सोन्याच्या बाजारात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांचा सहभाग वाढू शकतो. यामुळे सोन्याची मागणी वाढू शकते. मागणी वाढल्याने खाण कामगार, रिफायनर्स आणि किरकोळ विक्रेत्यांना फायदा होईल. भारतातील सुवर्ण उद्योगाच्या एकूण वाढीस चालना मिळू शकते. वन नेशन, वन गोल्ड रेटचे तोटे

छोट्या व्यावसायिकांना याचा फटका : सोन्याच्या व्यापारात ही पारदर्शकता येणार असली तरी त्याचे काही विपरीत परिणाम या व्यवसायावर होण्याची शक्यता आहे. सर्वात मोठा धोका म्हणजे प्रत्येक गावांमध्ये किंवा शहरांमध्ये असलेल्या छोट्या व्यावसायिकांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. या सर्वांना शहरातील किंवा गावातील मोठ्या व्यापार्यांच्या स्पर्धेमध्ये उतरावे लागणार असून त्यांचा टिकाव लागणार नाही. देशातील सर्व मोठे व्यावसायिक किंवा मोठ्या कंपन्या या आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवहार करतात व कमी किमतीला देशात सोने आयात करतात. त्यांच्या स्पर्धेमध्ये छोटे व्यापारी टिकू शकणार नाहीत व त्यामुळे अनेकांना व्यवसाय बंद करावे लागतील, तर काही जणांच्या अवलंबून असलेल्या नोकर्या जाण्याची शक्यता आहे. एकच दर राहिल्यामुळे छोट्या-मोठ्या व्यापाराला मिळणारा नफा हा कमी होणार आहे. जर नफा क्षमता कमी झाली तर व्यवसायात टिकून राहणे व व्यवसाय करणे अवघड जाणार आहे. एक दर झाल्यामुळे त्यांच्या धंद्यावर किंवा व्यवसायावर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आम्हीच राजे या धरतीचे!!

कधीकाळी आदिवासी समाज म्हणजे जंगलात राहणारा वस्त्रशून्य किंवा अर्धवस्त्र समाज असली ओळख आता आदिवासी समाजनेही पुसून मुख्य प्रवाहाची वाट धरली आहे. या समाजातून शिक्षित आणि स्पर्धा परीक्षांमध्ये नैपूण्य दाखविणाऱ्यांचा टक्कादेखील वाढला आहे. वर्तमानातून उज्वल भविष्याकडे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात जाताना आपल्या गौरवशाली परंपरांचे जतन करणारा आदिवासी समाज अशी एक नवी ओळख निर्माण झालेली आपणास इथे दिसते. आदिवासींना ढाल करुन काही शक्तींनी मधल्या काळात या विकासात खोडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र खऱ्या-खोट्याचा बोध झालेला आदिवासी आज नक्षलवाद्यांनाही विकासात आडवे येवू नका असे छातीठोकपणे सांगत आहे. पोलीस दलाच्या सहाय्याने नक्षलवाद्यांचा उघड विरोध करुन इथं आता विकासवाटेवर वाटचाल सुरु झाली आहे, असेच या दिनाच्या शुभेच्छा देताना म्हणता येईल. अशी महत्वपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींनी या लेखातून प्रस्तुत केली आहे.... संपादक.

दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी विश्व आदिवासी दिवस साजरा केला जातो. पृथ्वीवर कधी काळी असणारे डायनासोरसारखे अजस्त्र जीव खगोलीय घटनांमुळे नाम:शेष झाले. त्यानंतरच्या काळात आफ्रिका खंडातून मानव प्राण्याची उत्क्रांती झाली असे विज्ञान मानते. आफ्रिकेतून उत्क्रांत मानव प्राणी खंडाच्या प्रवासासोबत निरनिराळ्या खंडापर्यंत प्रवास करुन गेला आणि नंतरच्या काळात त्या खंडातील वातावरणाशी जुळवून घेत अधिक उत्क्रांत होत गेला. या सर्व प्रवासात शब्द, बोली आणि पुढे भाषा, संवाद अशी उत्क्रांती होत गेली असली, तरी जगाच्या निरनिराळ्या भागात आपल्या रुढी-परंपरा सांभाळून अनेक आदिम जमाती आजतागायत तग धरून आहेत. या जमाती किंवा मूळ निवासी यांची बोलीभाषा, रुढी परंपरा आजही कायम असल्याचे आपणास दिसते. जगात समाज व्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतर राष्ट्रांची निर्मिती, साम्राज्यवाद आणि त्यानंतर युद्ध असाही प्रवास झाला. १९व्या शतकात दोन महायुद्धे झाली. या महायुद्धांमध्ये प्रचंड असा विध्वंस झाला. त्यानंतरच्या काळात अस्तित्वात असणाऱ्या सर्व देशांनी एकमेकांचे स्वातंत्र्य, अधिकार, मैत्री, समन्वय यांना प्रथमच मान्यता दिली. त्याचा परिपाक म्हणून २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघ अस्तित्वात आला.

९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी जगभरात आदिवासी बांधव एकत्र येऊन आपापल्या संस्कृती प्रमाणे वेशभूषा, गायन, नृत्य करून हा दिवस साजरा करतात. मानवाची जसजशी उत्क्रांती होत गेली तसतसा मानव पृथ्वीवर निरनिराळ्या खंडापर्यंत प्रवास करू लागला. तेथील वातावरणाशी त्याने जुळवून घेतले. हळूहळू शब्द, बोली आणि पुढे भाषा, संवाद अशी उत्क्रांती होत गेली. आजही जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक आदिम जमाती आपली बोलीभाषा, रुढी परंपरा जपत निसर्गाच्या सानिध्यात राहत आहेत. आधुनिक दुनियेच्या झगमगटापासून आजही अनेक लोक कोसो दूर आहेत. अनेक वर्षांनंतर संयुक्त राष्ट्रसंघासमोर जी बाब समोर आली ती अतिशय धक्कादायक होती. ती बाब म्हणजे जगातील अनेक मूळ निवासी समुहांनी निसर्ग जपण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु आधुनिक समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ न शकल्यामुळे या आदिम जमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर अनेक सोयी, सुविधांपासून वंचीत राहिले आहेत. एका कवितेत वास्तव रेखाटले आहे ते योग्यच वाटते-

जंगलाचा मी रहिवासी  
नातं माझं निसर्गाशी,  
झाडे, वेली, पशू-पक्षी सारे  
आहेत माझे मित्र खरे,  
मंजुळ पावरी वाजे  
आम्ही आहोत जंगलाचे राजे !!

दि.९ ऑगस्ट १९९४पासून जगभरातील आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधा व त्यांचे हक्क मिळावे, यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न सुरू झाले. भारतात मात्र संविधानानुसार १९५०पासूनच आदिवासी जमातींच्या विकासाची भूमिका समोर ठेवून तरतूद करण्यात आली होती. संविधानामधील सर्वाधिक अनुच्छेद आदिवासी समाजाच्या हीत रक्षणासाठी आहेत. आदिवासी समाजाची एक स्वंतत्र जीवनशैली, रुढी, प्रथा, परंपरा आणि सामाजिक कायदे आहेत. अनेक ठिकाणी स्वशासनावर आधारित अशी समाजव्यवस्था अस्तित्वात होती. मात्र ब्रिटिश राजवटीत जमीन व जंगलावरील त्यांचा हक्क हिरावला गेला व त्यांच्या स्वयंपूर्ण समाजव्यवस्थेवर याचा प्रतिकूल परिणाम झाला. त्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आदिवासी समाजाला आपले हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी पेसा कायदा अस्तित्वात आला आहे. पेसा कायद्याचे प्रमुख सूत्र आदिवासींची संस्कृती, प्रथा परंपरा याचे जतन, संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांची स्वशासन व्यवस्था बळकट करणे हे आहे.

संयुक्त राष्ट्रात लहान मोठे असे जगभरातील देश ज्यांची एकूण संख्या १९२ इतकी आहे, ते एकत्र आले. सीमांचे प्रश्न, आरोग्य समस्या, विश्व वारसा याबाबत सकारात्मक बदल संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यासपीठातून जगासमोर आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजात तब्बल ५० वर्षे वाटचाल करताना जी बाब समोर आली, ती धक्कादायक अशी होती. जगातील विविध देशात साधारणपणे जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या मूळ निवासी समुहांनी पर्यावरण जपण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु समाजाच्या मुख्य प्रवाहात नसल्याने या आदिम जमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार या सर्वांपासून कोसो दूर राहिल्या होत्या. या मूळ निवासी आदिम जमातींचे अस्तित्व मान्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने दि.९ ऑगस्ट १९९४ या दिवशी विश्व आदिवासी दिवस घोषित केला. त्यावेळेपासून दरवर्षी या दिवसाच्या निमित्ताने या जमातींच्या मुलभूत सुविधा पुरविण्याकडे लक्ष वेधणे व त्या मिळवून देणे याला सुरुवात झाली. जागतिक स्तरावर या हालचाली खूप विलंबाने झाल्या असल्या, तरी भारतात मात्र देश स्वतंत्र झाल्यावर दि.२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान अस्तित्वात आले. यात आदिवासी जमातींच्या विकासाची भूमिका ठेवून तरतूद करण्यात आली. संविधानामध्ये एकूण २२ भाग, १२ अनुसूची व ३९५ अनुच्छेद आहेत. यामधील सर्वाधिक अनुच्छेद आदिवासी समाजाच्या हीत रक्षणासाठी नमूद आहेत. आदिवासी समाजाची एक स्वंतत्र जीवनशैली आहे. रुढी, प्रथा, परंपरा आणि सामाजिक कायदे यांच्या आधारे स्वशासन अशी त्यांची वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था अस्तित्वात होती. इंग्रजाच्या काळामध्ये त्यांचा जमीन व जंगलावरील हक्क हिरावला गेल्याने त्यांच्या स्वयंपूर्ण समाजव्यवस्थेला तडा जावून त्यांचे जीवन परावलंबी झाले. त्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पेसा कायद्याने आदिवासी समाजाला त्यांचे अधिकार पुन्हा बहाल केले आहेत. पेसा कायद्याचे प्रमुख सूत्र आदिवासींची संस्कृती, प्रथा परंपरा याचे जतन, संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवासींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे आहे. पेसा कायदा महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यातील आदिवासीबहुल गावांना लागू होतो. पेसा कायद्यांतर्गत सामाजिक हित, रुढी परंपरा, प्रथा व सांस्कृतिक ओळख यांचे जतन व संवर्धन करण्यास, तसेच सामुहिक मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास आणि आपआपसातील तंटे मिटविण्यास ग्रामसभा सक्षम आहे. यामध्ये आरक्षणाची तरतूद आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात परंतु निम्म्यापेक्षा कमी नाही इतके पंचायत राज संस्थामध्ये लोकप्रतिनिधी पदाचे आरक्षण, यामध्ये सरपंच पदाचे आरक्षणसुद्धा अंतर्भूत आहे. जमीन हस्तांतरणावर निर्बंध, भूमी संपादन व पुनर्वसन, कृषी, गौण वन उपज, लघु जलसाठे, गौण खनिजे, सावकारी परवाना, बाजार व्यवस्थापन, गावाचा विकास व आर्थिक व्यवस्थापन, अंमली पदार्थांचे नियमन, इत्यादी तरतूदी पेसा कायद्यात अंतर्भूत असून ग्रामसभेला पूर्ण अधिकार आहेत. आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात येणे शक्य व्हावे यासाठी आदिवासी बहूल जिल्ह्यामध्ये विविध सुविधा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन स्तरावर स्वतंत्र असे आदिवासी विकास मंत्रालय स्थापन करून हमखास असा निधी या विकासकामांना दिला जातो. राज्यात गडचिरोली, नंदूरबार आणि पालघर हे जिल्हे मुख्यत्वे करून आदिवासी बहूल जिल्हे आहेत. या जिल्ह्यात भौगोलिक आव्हानांवर मात करीत या सर्व समाजाला आरोग्य, शिक्षण, परिवहन सुविधा आदींनी जोडून मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आदिवासी आश्रमशाळा तसेच वसतीगृहे उपलब्ध करून दिली जात आहेत. केवळ इतके करून होत नाही तर इतर मुलांच्या बरोबरीने त्यांना स्पर्धा करता यावी, यासाठी त्यांच्यासाठी नामांकित शाळांमध्ये शिक्षणदेखील आता नव्याने सुरू झाले आहे. याठिकाणी आदीम जमातींचा अधिवास अतिशय दुर्गम भागात आहे. त्यामुळे आरोग्य सुविधा पुरविणे देखील एक मोठे आव्हान आहे. मात्र यात दळण-वळण साधने व इतर तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. गडचिरोली जिल्ह्यात मुख्यत्वे माडिया, गोंड तसेच परधान आदी आदीम जमाती आहेत. आदिवासींची मूळ भाषा आहे, यात माडिया व गोंडी या दोन मुख्य भाषा गडचिरोली जिल्ह्यात आहेत. या जमातीत मुख्य समाज भाषा रुजवताना त्यांची मूळ भाषा असणाऱ्या गोंडी-माडिया आदी भाषांचे संवर्धन कसे होईल. याबाबतही प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू करण्यात आले आहेत. त्यांच्या रुढी, परंपरा यांची माहिती इतरांना मिळावी, यासाठी प्रयत्न होत आहेत. कधीकाळी आदिवासी समाज म्हणजे जंगलात राहणारा वस्त्रशून्य किंवा अर्धवस्त्र समाज असली ओळख आता आदिवासी समाजनेही पुसून मुख्य प्रवाहाची वाट धरली आहे. या समाजातून शिक्षित आणि स्पर्धा परीक्षांमध्ये नैपूण्य दाखविणाऱ्यांचा टक्कादेखील वाढला आहे. वर्तमानातून उज्वल भविष्याकडे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात जाताना आपल्या गौरवशाली परंपरांचे जतन करणारा आदिवासी समाज अशी एक नवी ओळख निर्माण झालेली आपणास इथे दिसते. आदिवासींना ढाल करुन काही शक्तींनी मधल्या काळात या विकासात खोडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र खऱ्या-खोट्याचा बोध झालेला आदिवासी आज नक्षलवाद्यांनाही विकासात आडवे येवू नका असे छातीठोकपणे सांगत आहे. पोलीस दलाच्या सहाय्याने नक्षलवाद्यांचा उघड विरोध करुन इथं आता विकासवाटेवर वाटचाल सुरु झाली आहे, असेच या दिनाच्या शुभेच्छा देताना म्हणता येईल.

***************

- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.
मोबा- ७७७५०४१०८६.

# भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील सुवर्ण पान : ऑगस्ट क्रांती दिन

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह काँगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते. आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. 'क्रांतीकारी' याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते. या ऐतिहासिक 'चले जाव' आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर 'वंदे मातरम्' हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदयासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते. या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर सन १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४६ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय. त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुल, १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८२ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

******

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# सामाजिक भेद मिटवणे हे मूळ उद्दिष्ट, मग आरक्षण ही 'गरिबी हटाव' योजना कशी असू शकते?

भारतासारख्या देशात जातीजातींमध्ये भेदाभेद होता. काहींना माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार नाकारला गेला होता. पाच हजार वर्षांपासून त्यांचे अधिकार उच्चवर्णीयांनी बळकावले होते. काही जाती तर अस्पृश्यतेचे चटके आयुष्यभर अनुभवत आल्या. १९४७ मध्ये स्वातंत्र्याची पहाट उगवली आणि या सर्वांना वाटले की आता तरी आपले अधिकार आपल्याला मिळतील. त्यांच्या जीवनामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरसारखा क्रांतीसूर्य आला होता म्हणूनच त्यांच्या जीवनात आशेचा किरणा आला होता.

बाबासाहेबांमुळे त्यांच्या जीवनामध्ये फरक पडायला सुरुवात झाली. नोकरीमध्ये त्यांना आरक्षण मिळू लागले. त्यामुळे त्यांना काही प्रमाणात प्रतिनिधित्व मिळायला लागले. पण नोकरी मिळायला लागली ती मात्र सर्वात निम्न स्वरुपाची. त्यात काही अगदी बोटावर मोजण्याएवढे लोक वरच्या स्तरात गेले. पण त्यातही महत्वाची पदे त्यांना मिळू शकली नाहीत. कारण त्यात महत्वाचा खोडा होता, तो म्हणजे त्यांची जात. तरीही याच समाजांमधून काही लोक वरच्या पदांवर गेले, पण ते आपला भूतकाळ विसरले. स्वतःला उच्च वर्ण समजू लागले. त्यांच्या बोलण्यात 'हो ला हो' मिळवू लागले. त्यात काही समाजाप्रति जागरूक होते. ते त्यांच्या परीने प्रयत्न करीत होते पण ही संख्यासुद्धा अगदी बोटावर मोजण्याएवढी. त्यामुळे या व्यवस्थेविरुद्ध लढण्यात त्यांना मर्यादा आल्या आणि याचाच फायदा घेऊन उच्चवर्णीय पुन्हा एकदा या देशात सर्व क्षेत्रांत महत्वाच्या जागा बळकावण्यात समर्थ ठरले. मागील ७५ वर्षांत खरोखरच तळच्या स्तरांतील, वेगवेगळ्या जातीजमातीतील लोकांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले की नाही याचा कोणी विचार केला नाही. सर्वांनी फक्त आपल्या राजकारणासाठी त्यांचा वापर केला. आजही कितीतरी जागा रिक्त आहेत. तरीही अनुसूचित जाती-जमातीतील उमेदवार असले तरीसुद्धा ते 'नॉट सुटेबल' आहेत, असा शेरा देऊन ती जागा रिक्त ठेवली जाते. त्यानंतर ती जागा खुल्या वर्गासाठी खुली केली जाते. अशा रितीने मागास, वंचित वर्गाच्या तोंडातील घास हिरावून घेतला जातो. कितीतरी लोकांनी जातीचे खोटे प्रमाणपत्र बनवून खरोखर त्या जातीत असलेल्या लोकांचे हक्क हिरावून घेतले आहे. न्यायालयात या केसेस गेल्या, पण आजपर्यंत एकाही व्यक्तीला शिक्षा झाली नाही. याउलट जातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्याला संरक्षण दिले जाते, कारण काय तर त्याला आता नोकरीतून काढले तर त्याचे घर उघड्यावर पडेल.

# मनपा बांधकाम विभागाचा महत्वाकांक्षी उपक्रम

### प्रायोजकांना जाहिरातींचे अधिकार देऊन होणार शहराचे सुशोभीकरण




लातूर/प्रतिनिधी: लातूर महानगरपालिका हद्दीतील चौक, प्रवेशद्वार, परीसर, रस्ता दुभाजक, बस थांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा, दवाखाने, कारंजे व इतर म.न.पा. कार्यालये यांचे सुशोभीकरण करुन शहर सौंदर्यीकरण करण्याच्या सूचना मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी प्रशासनास दिले आहेत. त्यानुसार मनपाची आर्थिक परिस्थिती व उपलब्ध निधी विचारात घेता स्पोन्सॉर च्या माध्यमातून शहरातील प्रवेशद्वार, चौक, रस्ता दुभाजक, बसथांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा,दवाखाने, कारंजे यांची दुरुस्ती, सुशोभिकरण, निगा व देखभाल करण्याचे नियोजन उपायुक्त(बांधकाम) डॉ पंजाब खानसोळे व शहर अभियंता विजय चव्हाण यांनी केले आहे. त्यानुसार शहरातील इचुक एजन्सी/व्यावसायिक /नागरिकाना प्रवेशद्वार, चौक, रस्ता दुभाजक, बसथांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा,दवाखाने, कारंजे यांची देखभाल दुरुती व सुशोभिकरण करण्याची व त्याच ठिकाणी स्वतः च्या व्यवसायाची जाहिरात करण्याची नामी संधी महापालिकेने उपलब्ध करुन दिली आहे. सदरील उपक्रमाअंतर्गत ३ वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन जागा विकसीत करण्याचा मक्ता जाहिर ई-लिलावद्वारे देण्यात येणार आहे. संकेतस्थळ ु.शर्रीलींळेप.र्सीं.ळप यावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. लिलावात सहभाग घेण्यासाठी रु. १०००/- माहिती पुस्तिका किंमत व रु. ५०००- बयाना रक्कम मा. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे नावे भरणा केल्यास सहभाग घेता येणार आहे.

ई-लिलावात सहभाग घेणा-यांसाठी दि. १६/०८/२०२४ पर्यंत कागदपत्र ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सादर करण्याची मुदत असून लिलावासाठी पात्र बोलीदारांना पात्र करण्याची मुदत १९/०८/२०२४ व २०/०८/२०२४ पर्यंत आहे. पात्र बोलीदारांना कामनिहाय दि. २१/०८/२०२४, २२/०८/२०२४, २३/०८/२०२४ व दि. २४/०८/२०२४ रोजी ई-लिलावामध्ये सहभाग घेता येणार आहे.तरी जास्तीत जास्त व्यावसायिक, संस्था यांनी यात सहभाग नोंदवावा असे आव्हान उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

# दलित हत्याकांडातील विरोधात आणखी तीव्र आंदोलनाचा इशारा देत जबाब दो धरणे आंदोलनाची सांगता

### आंदोलक भीमसैनिकांनी दिले जिल्हाधिकाऱ्यांना न्यायमागण्यांचे निवेदन

: आंदोलक भीमसैनिकांनी दिले जिल्हाधिकाऱ्यांना न्यायमागण्यांचे निवेदन
लातूर : लातूर जिल्ह्यातील दलित हत्याकांडांच्या घटनांमधील आरोपींविरुद्ध खूनाचे व अट्रोसिटीचे गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी तसेच सीआयडी मार्फत चौकशी करून सदरील खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीना फाशीची शिक्षा देण्यात यावी व मयत दलित युवक, विद्यार्थी व अत्याचारीत युवकांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा, आदी मागण्यासाठी ६ ते ८ ऑगस्ट पर्यंत लातूर येथील महात्मा गांधी चौकात सुरु असलेले जबाब दो धरणे आंदोलनाची सांगता ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी प्रचंड घोषणाबाजीत करण्यात आली. याप्रसंगी भंते पयानंद थेरो उपस्थित दलित नेत्यांनी दलित हत्याकांड व अत्याचाराच्या विरोधात आक्रमक अशी भाषणे करून सरकारने याबाबत तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा लवकरच विराट मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. सदर भीमसैनिकांच्या धरणे आंदोलनाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाऊन निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात भारतीय बौद्ध महासभेचे एन.यू. बलांडे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव कांबळे, रिपाइं आठवले पक्षाचे नेते चंद्रकांत चिकटे, वंचित बहुजन आघाडीचे सचिन गायकवाड, भिमशक्तीचे मोहन माने, कॉंग्रेसचे यशपाल कांबळे, युवा भिम सेनेचे पंकज काटे, प्रा. अनंत लांडगे, भिम आमचे अक्षय धावारे, युथ पँथर संघटनेचे संतोष वाघमारे, प्रताप कांबळे, ब्लू पँथर संघटनेचे साधू गायकवाड आदींसह विविध पक्ष -संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



लातूर शहर व जिल्ह्यात मागील दोन महिन्यांपासून विविध ठिकाणी दलित समाजातील युवक, विद्यार्थ्यांना जातीयद्वेषातून लक्ष्य केले जात असून त्यांच्या अमानुषपणे हत्या करण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर अत्याचाराच्या घटनांमध्येही वाढ झालेली आहे. प्रामुख्याने लातूर शहरातील एमआयडीसी भागातील जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या राजमाता जिजाऊ वसतीगृहात इयत्ता सातवीच्या वर्गात शिकणाऱ्या बौद्ध समाजातील अरविंद राजाभाऊ खोपे या १३ वर्षीय विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू झालेला आहे. चाकूर तालुक्यातील नायगाव येथील कु. सायली सिद्धार्थ गायकवाड हिचा नांदेड रोडवरील एका मुलीच्या वस्तीगृहात बलात्कार करून खून करण्यात आलेला आहे. तसेच औसा तालुक्यातील भूसणी येथील आकाश व्यंकट सातपूते या युवकाचा खून करण्यात आलेला आहे. उदगीर पोलिस ठाणे अंतर्गत देवणी येथे सचिन शिवाजी सूर्यवंशी या युवकाचाही जातीय मानसिकतेतून खून करण्यात आला. या शिवाय शिरूर अनंतपाळ येथील विनोद पंढरी कांबळे व बालाजी शेषेराव कांबळे या दोघांना जबर मारहाण करून अत्याचार करण्याची घटना घडलेली आहे. या सर्व घटनांमधील सर्व आरोपींविरुद्ध खूनाचे व ट्रोसिटीचे गुन्हे दाखल करून सीआयडी मार्फत चौकशी करावी. तसेच सदर प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. आदी प्रमुख मागण्यांचा समावेश सदरच्या निवेदनात करण्यात आलेला आहे. शासन व पोलिस प्रशासनाने मागण्यांबाबत दखल नाही घेतल्यास लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. जबाब दो धरणे आंदोलनाला विविध पक्ष-संघटनांचा मिळाला सक्रिय पाठींबा- भारतीय बौद्ध महासभा,अ. भा. काँग्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्ष, लोकसेवा माथाडी कामगार युनियन,

भिम टायगर युवा संघटना, भिमशक्ती संघटना, भिम आर्मी संघटना, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट, रिपब्लिकन सेना, सार्वजनिक जयंती उत्सव समिती, व्हिजन करिअर अकॅडमी, एकता ग्रूप, वंचित बहुजन आघाडी, विद्रोही ग्रूप, मागासवर्गीय सेवानिवृत कर्मचारी संघटना, यूथ पँथर संघटना, युवा भिमसेना, ब्लू पँथरसंघटना, लातूर पूर्व भाग नागरी कृती समिती अशा विविध पक्ष,संघटनांनी या धरणे आंदोलनाला सक्रिय पाठींबा दिला होता.

# भाजपचे संघटन हीच शक्ती.... लोककल्याणकारी योजना व विकास कामे जनतेपर्यंत पोहचवा भाजप नेत्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना जिल्हा कार्यकारिणी बैठकीत आवाहन




लातूर : भाजपचे संघटन हीच शक्ती असून लोककल्याणकारी योजना व विकास कामे कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी जनतेपर्यंत पोहचवण्याचे जोमाने काम करावे, असे आवाहन लातूर जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी आज केले आहे. भारतीय जनता पार्टी लातूर शहर व लातूर ग्रामीण जिल्ह्याची विस्तारित कार्यकारिणीची एक व्यापक बैठक आज माजी पालकमंत्री तथा आ. संभाजी पाटील निलंगेकर, विधान परिषद आमदार रमेश अप्पा कराड, , माजी खासदार सुनील गायकवाड, भाजप शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये लातूर शहरातील कातपूर रोड येथील पार्वती मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. या बैठकीत सदरचे आवाहन भाजपच्या प्रमुख उपस्थित नेत्यांनी केले आहे.

यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपच्या मान्यवर नेत्यांनी भारतीय जनता पक्षाच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. देशाच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांची विधान परिषदेवर निवड झाल्याबद्दल सदर बैठकीत अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. विरोधी पक्षाकडून पसरवल्या जाणाऱ्या फेक नेरेटिव्हला बळी न पडता, भारतीय जनता पक्षाच्या सरकारने मंजूर केलेल्या लोककल्याणकारी योजना व विकास कामे आपल्याला जनतेपर्यंत पोहचवणे हि आपल्या सर्व कार्यकर्त्यांची प्रमुख जबाबदारी आहे असे प्रतिपादन सर्व वक्त्यांनी यावेळी केले. या बैठकीस माजी आमदार बब्रुवान खंदाडे, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी आमदार गोविंद केंद्रे, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, विधानसभा निवडणूक प्रमुख लातूर गुरुनाथ मगे, भारत चामे, राहुल केंद्रे, प्रेरणाताई होनराव, तसेच सर्व प्रदेश पदाधिकारी,सर्व प्रदेश कार्यकारिणी सदस्य, सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधी, सर्व जिल्हा कार्यकारिणी, सर्व मंडळ कार्यकारिणी, सर्व मोर्चा कार्यकारिणी, सर्व प्रकोष्ठ कार्यकारिणी, सर्व शक्ती केंद्र प्रमुख,सर्व सुपर वॉरियर्स, सर्व बूथ प्रमुख व सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीत जनता उद्धव ठाकरेंना धडा शिकवेल

मुंबई (प्रतिनिधी) : आम्ही जनतेच्या न्यायालयात जाऊन न्याय मागणार असल्याची वल्गना उद्धव ठाकरे करत आहेत मात्र हिंदुत्वाला दिलेली तिलांजली, सरकारी योजनांमध्ये खोडा घालण्याचे प्रयत्न व २०१९ मध्ये जनादेशाचा केलेला अनादर यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत ठाकरे यांना जनता नाकारल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास भाजपाचे नेते आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी गुरूवारी येथे व्यक्त केला. बांगला देशमध्ये हिंदूंच्या हत्या होत असताना त्याचा निषेध करण्याएवढे ठाकरे सेनेचे हिंदुत्व जागृत नाही, असा टोला त्यांनी लगावला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे हे दिल्ली दौ-यावर आहेत. ठाकरे यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन भाजपावर जोरदार टीका केली. या टीकेला दानवे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे राज्याच्या भल्यासाठी, जनतेच्या हितासाठी दिल्लीला जातात तेव्हा महाराष्ट्र दिल्लीच्या इशा-यावर चालू देणार नाही, या शब्दांत उद्धव ठाकरे टीका करतात. मग हेच ठाकरे महाशय आता दिल्ली दौ-यावर का गेले? मुख्यमंत्रिपदाची याचना करण्यासाठी कोणाच्या दारात गेले? असे सवाल दानवे यांनी केले. दिल्ली दौ-यात ठाकरे यांनी आपणच किती कार्यक्षम मुख्यमंत्री होतो हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत विविध नेत्यांच्या भेटींदरम्यान मुख्यमंत्रिपदाची याचना करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. महाविकास आघाडीतील एका सहका-याने त्यांच्या पुस्तकात तत्कालीन मुख्यमंत्री ठाकरे त्यांच्या संपूर्ण मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात केवळ एक दिवस मंत्रालयात गेले याची खंत वाटते, असे मत व्यक्त केले होते.

# सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणीक कर्ज देताना अटी, निकष कमी करावे- खासदार ओमराजे निंबाळकर यांची लोकसभेत मागणी



धाराशिव :- पिक कर्ज वाटप करताना बँकाकडून शेतकऱ्यांना सिबीलस्कोरमुळे पिक कर्ज नाकारले जाते. शासनाकडून सिबीलस्कोर न पाहता पिक कर्ज वाटप करण्यात यावे. शेतकऱ्यांनी ओ.टी. एस. करुन कर्ज भरणा केल्यानंतर नव्याने कर्ज मिळत नाही. ओ.टी.एस. मधून कर्ज भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांनाही पिक कर्ज देण्यात यावे.

सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देताना बँकाकडून एन.ए. प्रॉपर्टी किंवा पगारपत्रकाची मागणी केली जाते. सर्वसामान्य नागरीक एन.ए. प्रॉपर्टी देवू शकत नसल्याने अनेक कर्ज प्रकरणे टाळली जातात. जिल्हयातील भांडी घासणाऱ्या महिलेची मुलगी निट परीक्षेत पात्र ठरली. तसेच भेळवाल्या छोटया व्यवसायीकाचा मुलगा देखील निट परीक्षेत वैद्यकीय व्यवसायीक शिक्षण घेण्यास पात्र ठरला. परंतू त्यांच्याकडे एन.ए. प्रॉपर्टी नसल्यामुळे शैक्षणिक कर्ज मिळविण्यात अडचण निर्माण झाल्या. या उदाहरणासह शैक्षणिक कर्ज मिळवण्यात एन.ए. प्रॉपर्टीची अट पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मंजुर होण्यास अडचणीची ठरत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या विद्यार्थ्यांनी डॉक्टर,इंजिनिअर किंवा अन्य उच्च शिक्षण घ्यायचे नाही का असा प्रतीप्रश्न करत सदर अट रद्द करुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज सहज उपलब्ध करणेकरीता लोकसभेच्या सभागृहात मांडला. उद्योगपती जेव्हा आर्थीक अडचणीत येतात तेंव्हा त्यांना कर्ज माफी, अनुदान अर्थसहाय्य शासन करते. त्याचप्रमाणे देशातील ७० टक्के लोक ज्या शेतीउद्योगावर अवलंबून आहेत. त्या शेतकऱ्यांना कायम नैसर्गीक आपत्ती, शासनाचे शेतकरी विरोधी धोरण यामुळे आर्थिक संकटात असतो. शेतीला उद्योग समजून कर्ज माफी तसेच अनुदानाच्या माध्यमातून अर्थसहाय्य शासनाने दिले पाहिजे अशी आग्रही मागणी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत बोलताना केली.

यावेळी राजेनिंबाळकर म्हणाले, पिक कर्ज वाटप करताना बँकाकडून शेतकऱ्यांना सिबीलस्कोरमुळे पिक कर्ज नाकारले जाते. शासनाकडून सिबीलस्कोर न पाहता पिक कर्ज वाटप करण्यात यावे. शेतकऱ्यांचे थकीत कर्जामुळे होल्ड केलेले अकाऊंन्ट तात्काळ चालू करुन गेल्या वर्षीच्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांना बँकेच्या मुजोरीमुळे त्रास सहन करावा लागत आहे ही गोष्ट सभाग्रहाच्या लक्षात आणुन दिली.

खरीप हंगाम २०२४ करीता धाराशिव जिल्हयाचे पिक कर्ज वाटपाचे १५०० कोटी , लातूर जिल्हयाचे २४०० कोटी तसेच बार्शी तालुक्याचे ३८१ कोटीचे उद्दीष्ठ वेळेत पुर्ण होणे आपेक्षीत असताना आतापर्यंत केवळ ५३% कर्ज वाटप राष्ट्रीयकृत बँकाकडून करण्यात आले. तसेच आर.ए.सी. सी.च्या नावावर शेतकऱ्यांच्या चार महिण्यापेक्षा जास्त कालावधी घेवून देखील शेतकऱ्यांचे कर्ज प्रस्ताव मंजुर झालेले नाहीत, ही बाब निदर्शनास आणुन दिली.

विजय मल्यासारखे उद्योगपती मोठयाप्रमाणात कर्ज घेवून देशातून परगंदा होतात. परंतू जे शेतकरी वन टाईन सेटलमेंट (जढड) अंतर्गत कर्ज भरतात, अशा शेतकऱ्यांना नंतर कोणतीही बँक कर्ज देत नाही. तसेच ऑनलाईन कर्ज देणारे खाजगी प ३० ते ३५% पर्यंत विविध मार्गातून व्याजाची आकारणी करतात असे व्यवहार करणाऱ्या पवर बंदी आणण्यात यावी. तसेच खाजगी क्षेत्रातील बँका शेतकऱ्यांना पिक कर्ज देते वेळेस दुप्पट किंमतीचे गहाणखत करुन घेतात त्यावरती निर्बंध आणण्याची गरज असल्याचे लक्षात आणुन दिले. तर शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडीट कार्ड या योजनेचे व्याप्ती व कर्ज मर्यादा वाढवण्यात यावी. याचबरोबर शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाची पुर्न:गटन व नुतनीकरण करण्यात सुसुत्रता निर्माण करण्यात यावी, या मागण्या सभागृहात खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर केल्या.

# ऑल इंडिया भावसार क्षत्रिय महासभा महिला व युवा परिषद







लातूर :- ऑल इंडिया भावसार क्षत्रिय महासभा महिलां व युवा परिषद व तसेच सांस्कृतिक कमिटी लातूर यांच्या संयुक्त विद्यामाने लातूर भावसार क्षत्रिय समाजातील यशवंत व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला त्या वेळी ऑल इंडिया भावसार क्षत्रिय महासभा ए आय बी एम के चे युवा राष्ट्रीय अध्यक्ष श्रीरामजी सरवदे,लातूर चे नेत्ररोग तज्ञ डॉ रुपेश राखोडे व डॉ सौ राधिका राखोडे लातूर भावसार समाजाचे माजी अध्यक्ष रमेशजी फटाले सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस कार्यालयाचे पोलीस उप - निरीक्षक रमेशजी गर्जे लातूरचे प्रसिद्ध व्यापारी बंडोपंतजी तांदळे व लक्ष्मीकांतजी माळवद कर , विजयकुमार माळवदकर ए आय बी के एम चे राष्ट्रीय युवा सह - सचिव सौ डॉ वर्षा महिंद्रकर ए आय बी के एम च्या महाराष्ट्र राज्य परीषदेच्या महिला अध्यक्ष सौ कोमलताई वायचाळकर लातूर चे अध्यक्ष सुनील अभंगे, सचिव धनंजय तांदळे, सांस्कृतिक अध्यक्ष, सचिन महिंद्रकर, किशोर पुकाळे, युवा परिषदेचे अध्यक्ष डॉ गणेश मानकोसकर,सचिव निलेश पतंगे, अमित पुरबुज, रोहित हंचाटे, हे सर्व वरील मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ प्रिती प्रशांत सोनकर सूत्रसंचालन सौ सुप्रिया ताई वायचळे, श्रीमती रजनीताई ढगे यांनी केले यानंतर सर्व गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नवजीवन पॅथॉलॉजी लॅब चे संचालक दत्तात्रय अपसिंगेकर,सौ मयुरी कालेकर,कु सानवी कठाडे,कु स्वासिका तांदळे समस्त भावसार समाजातील बंधू भगिनी चे सहकार्य लाभले या कार्यक्रमाची सुरुवात भावसार समाजाची आराध्य दैवता श्री हिंगुलांबिका देवी च्या आरती ने व गायत्री मंत्र म्हणून सुरुवात केली.

# मोरबे धरण प्रकल्पस्थळी मा. आमदार: गणेश नाईक यांनी दिली भेट

## संपूर्ण नवी मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाची केली पाहणी





नवी मुंबई / के. एच. हनवते :- संपूर्ण नवी मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या आणि नवी मुंबई महापालिकेच्या मालकीच्या असणाऱ्या मोरबे धरण प्रकल्पस्थळी आज ऐरोलीचे आमदार श्री. गणेशजी नाईक यांच्या समवेत भेट दिली. या भेटीदरम्यान मा. महापौर श्री . सागरजी नाईक हे देखील उपस्थित होते . महानगरपालिकेच्या वतीने अतिरिक्त शहर अभियंता श्री. अरविंदजी शिंदे, मोरबे धरण विभाग - कार्यकारी अभियंता श्री. सुभाषजी सोनवणे, संबंधित अधिकारी व अभियंता उपस्थित होते. भेटीच्या पार्श्वभूमीवर मोरबे धरण प्रकल्पाची व परिसराची पाहणी केली. मोरबे धरणाची क्षमता, खोली, विसर्ग करण्याची पध्दत समजून विसर्ग करण्याचा निर्णय कसा घेतला जातो ... याविषयीची माहिती अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. तसेच या भेटीदरम्यान जलशुध्दीकरणाची कार्यपध्दती जाणून घेतली तसेच जलवितरणाच्या पध्दतीची देखील माहिती घेतली. प्रतिदिन ४५० द.ल.लि. क्षमतेच्या स्वत:च्या मालकीच्या नवी मुंबई महानगरपालिका मोरबे धरण प्रकल्पामुळे नवी मुंबईची जलसमृध्द शहर अशीही ओळख आहे. पाताळगंगा नदीची उपनदी असलेल्या धावरी नदीवर मोरबे धरण प्रकल्प उभा असून तेथून भोकरपाडा येथील जलशुध्दीकरण केंद्र प्रकल्पाठिकाणी पाणी आणले जाते व त्याठिकाणी शुध्दीकरण होऊन नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा केला जातो आणि म्हणूनच मोरबे धरण प्रकल्पाची पाहणी करताना धरण परिसरात सक्षम सुरक्षा यंत्रणा, पाण्याची सुरक्षा , धरण क्षेत्रात अतिक्रमण होऊ नये याची दक्षता तसेच धरण परिसराचे सुशोभिकरण , मोरबे धरण परिसराकडे येणाऱ्या रस्त्यांची झालेली दुरावस्था .. या मुद्द्यांवर विशेष सूचना महापालिका अधिकाऱ्यांना केल्या .

नवी मुंबईचे नागरिक स्वत:च्या हक्काच्या मोरबे धरण प्रकल्पामुळे पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत समाधानी म्हणून ओळखले जातात असे असले तरी भविष्याचा विचार करत या भेटीदरम्यान पुन्हा एकदा भिरा प्रकल्पाचा उल्लेख करत या गोष्टीकडे लक्ष वेधले कि , जर या प्रकल्पाची राज्य सरकारच्या मंजुरीने अंमलबजावणी केली गेली तर या प्रकल्पातून १००० द.ल.लि. पाणी पुरवठा महापालिकेला होईल आणि भविष्यकाळामध्ये नवी मुंबईत पाण्याची आणीबाणी आणि पुरवठ्याचे संकट उदभवणार नाही. त्यामुळे या प्रकल्पाच्या बाबतीत महापालिकेने तातडीने भूमिका घ्यावी अश्या सूचना देखील अधिकाऱ्यांना केल्या.

## बांधकाम कामगारांचे काही बंद असलेले कल्याणकारी योजनांचे काम त्वरित सुरू करण्यात येइल असे बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांनी शिष्टंडळास आश्वासन दिले.

मुंबई/ प्रतिनिधी :- सोमवार दिनांक पाच ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील विविध कामगार संघटनांचे नेत्यांचे शिष्टमंडळ बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांना भेटून त्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनातील मागण्या संबंधी सचिवांनी स्पष्ट केले की नोंदीत बांधकाम कामगारांच्या मृत्यू बद्दलचे कोणतेही अर्ज प्रलंबित ठेवण्यात येणार नाहीत नातेवाईकांनी प्रत्यक्ष मंडळाशी संपर्क केल्यास त्यांचे अर्ज पाहून मंजूर करण्यात येतील.सध्या महाराष्ट्रामध्ये दहा लाखापेक्षा जास्त बांधकाम कामगारांना भांड्याचे साहित्य व सुरक्षा संच वाटप करण्यात आलेले आहेत परंतु ते सर्वच कामकाज ऑनलाइन नसल्यामुळे बांधकाम कामगारांना हे लाभ मिळवून घेण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. म्हणूनच भांड्याचे साहित्य व संच पेटी मिळण्यासाठी सुद्धा ऑनलाईन अर्ज बांधकाम कामगारांना करता येतील आणि क्रमवारीनुसार त्यांना त्वरित साहित्य मिळेल.सध्या महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांच्या मध्ये बांधकाम कामगारांचे कल्याणकारी लाभ देण्याचे कामकाज थांबलेले आहे तरी ते सर्व कामकाज त्वरित सुरू करण्यात येईल असेही आश्वासन त्यांनी दिले. बांधकाम कामगारांना कामाच्या अनुभवाचे ९० दिवसाचे प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येतात म्हणूनच नाका कामगार यांना विविध मालकांच्याकडून काम केल्याचे दाखले घेण्यासाठी मंडळाकडून पुस्तिका प्रत्येक जिल्ह्यास पुरवण्यात येईल या पुस्तके शिवाय ९० दिवसाचे प्रमाणपत्र इतर कोणाकडूनही घेण्याची आवश्यकता बांधकाम कामगारांना राहणार नाही. सध्या जे सर्व प्रलंबित अर्ज आहेत त्या अर्जातली संख्या लवकरच कमी होईल. कारण सध्या महाराष्ट्रामध्ये २४० पेक्षा जास्त तालुक्यांच्या मध्ये स्वतंत्रपणे बांधकाम कामगारांचे नोंदणी



करणे नुतणीकरण व लाभ देण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. त्यामुळे सर्व प्रलंबित अर्ज लवकरच निकालात निघतील.बांधकाम कामगारांच्या आधार कार्ड मध्ये चूक झाल्यास किंवा मोबाईल क्रमांक मध्ये चूक झाल्यास प्रत्येक कल्याणकारी केंद्रामध्ये त्वरित दुरुस्ती करण्याची व्यवस्था करण्यात येईल.या सर्व निर्णयाचे बांधकाम कामगार संघटनांच्या वतीने बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ सचिव विवेक कुंभार यांचे आभार मानण्यात आले.शिष्यमंडलमध्ये महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना कृती समितीचे नेते कॉ शंकर पुजारी,साथी सागर तावडे,आयुष्यमान शंकर माने,उस्मान शेख इत्यादी नेते प्रतिनिधींचा समावेश होता.

## अंधश्रद्धा टाळा अन् विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगा - डॉ.रामशेट्टी शेटकार

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक विल्यम बेटेसन यांची जयंती साजरी



लातूर : सध्याचे युग हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे युग असून विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम,जयंत नारळीकर,सी. व्ही.रमण व रघुनाथ माशालकर अशा दिग्गज वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे.कारण विज्ञान हे आपणाला मिळालेले अलौकिक वरदानच असून विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण प्रयोग व निष्कर्षावर भर दिला पाहिजे.मराठी साहित्यात विज्ञान साहित्याची वानवा असून विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी कथा,कादंबरी,कविता अशा दर्जेदार साहित्याची निर्मिती केली पाहिजे.आज २१ व्या शतकातही अज्ञान,अंधश्रद्धा,बुवाबाजी, जादूटोणा,मंत्रतंत्र,करणी,भानामती,भूतबाधा यामुळे बहुसंख्य लोक बळी पडत आहेत, म्हणूनच याचे समाजातून समूळ उच्चाटन झाले पाहिजे.त्यामुळेच विद्यार्थ्यांनी समाजजीवनातील अंधश्रद्धा,वाईट रूढी,प्रथा,परंपरा बाजूला सारून समाजजीवनात विज्ञानवादी दृष्टिकोन वृद्धिंगत होण्यासाठी कृतीसह जनजागृती केली पाहिजे.अंधश्रद्धा टाळून,विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगून गाव,समाज आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास केला पाहिजे,असे प्रतिपादन प्रा.डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी केले.

येथील दि.०८ ऑगस्ट २०२४ रोजी वैज्ञानिक विल्यम बेटेसन यांची १६३ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार आणि डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्वेता मदने यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी. प्रथम वर्षातील श्रीमंगले विशाखा या विद्यार्थीनीने सांगितले की,०८ ऑगस्ट १८६१ रोजी जन्मलेले विल्यम बेटेसन हे एक इंग्लिश जीवशास्त्रज्ञ होते,जे आनुवंशिकतेच्या अभ्यासाचे वर्णन करण्यासाठी जनुकशास्त्र हा शब्द वापरणारे पहिले व्यक्ती होते आणि ग्रेगर मेंडेल यांनी १९०० मध्ये ह्यूगो डी व्हाईस आणि कार्ल कॉरेन्स यांच्या पुनर्शोधानंतर त्यांच्या विचारांची लोकप्रियता होते.त्यांचे १८९४ चे मटेरिअल्स फॉर द स्टडी ऑफ व्हेरिएशन हे पुस्तक आनुवंशिकतेच्या नवीन दृष्टिकोनाच्या सुरुवातीच्या सूत्रांपैकी एक होते.०८ फेब्रुवारी १९२६ रोजी या महान शास्त्रज्ञांची प्राणज्योत मावळली.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच जैवतंत्रज्ञान विभागातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातुरात लवकरच लिंगायत हक्क परिषद व बिझनेस एक्स्पोचे आयोजन करणार : काका कोयटे

लातूर : खऱ्या अर्थाने लिंगायतांची राजधानी समजल्या जाणाऱ्या लातूर शहरात वीरशैव लिंगायत समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात सत्तेत वाटा मिळावा याकरिता लिंगायत हक्क परिषद व लिंगायत समाजातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी बिझनेस एक्स्पोचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती वीरशैव इंटरनॅशनल असोसिएशन तथा लिंगायत संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष काका कोयटे यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.




महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण राज्यस्तरीय बैठक गुरुवारी लातुरात संपन्न झाली. उद्योग - शिक्षण - राजकारण - समाजकारण अशा अनेक क्षेत्रातील वीरशैव लिंगायत समाजातील मान्यवर या बैठकीच्या अनुषंगाने लातुरात उपस्थित होते. या बैठकीनंतर पत्रकारांना संबोधित करताना काका कोयटे बोलत होते. महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या साडेसात टक्के असणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाला आगामी विधानसभा निवडणुकीत किमान २१ ते २२ मतदार संघात उमेदवारी देणाऱ्या राजकीय पक्षाच्या पाठीशी आपला समाज राहणार आहे. प्रत्येक पक्षात आमच्या समाजाला सत्तेत जागा मिळाली पाहिजे. आपल्या समाजाच्या याच मागणीसाठी लातुरात लवकरच लिंगायत हक्क परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे असे सांगून काका कोयटे म्हणाले की, या हक्क परिषदेत सर्वच प्रमुख राजकीय पक्षाच्या नेत्यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

या हक्क परिषदेच्या स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी सर्वानुमते रिलायन्स कॉलेजचे अध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या हक्क परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रेरणा होनराव, संजय शेटे, प्रा. गिरजाप्पा मुचाटे, शैलेश हवनाळे , राजाभाऊ मुंडे, बडुरे यासह समाजाचे राज्यभरातील पदाधिकारी आतापासूनच कामाला लागले आहेत. राज्यात लिंगायत समाजाची लोकसंख्या ९० लाख १५ हजारांहून अधिक आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात सत्तेत वाटा मिळालाच पाहिजे, या मागणीसाठी सदर हक्क परिषद आयोजिण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील वीरशैव लिंगायत सुशिक्षित बेरोजगार तरुण, उद्योजकांसाठी लातूरमध्ये बिझनेस एक्स्पोचे आयोजनही करण्यात येणार आहे. साधारणतः दि. ३१ ऑगस्ट ते दि. १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत हा बिझनेस एक्स्पो पार पडेल. या बिझनेस एक्स्पो मध्ये स्मॉल मशिनरी एक्स्पो म्हणजे किमान १०० पेक्षा जास्त मशिनरी उपलब्ध करून दिल्या जातील. या मशिनरीचा उपयोग, पॅकिंग,ब्रँडिंग व मार्केटिंगची सगळी माहितीही यावेळी दिली जाईल. मशिनरी खरेदी करू इच्छिणाऱ्या लिंगायत समाज बांधवास तात्काळ वीरशैव आर्थिक संस्थांच्या माध्यमातून कर्जाची उपलब्धी करून दिली जाईल. यासाठी युथ विंगचे प्रदीप सत्वे , भगवान कोठावळे, स्वप्नील खडके यासह अन्य युवा पदाधिकारी सहकार्य करतील. या बिझनेस एक्स्पो मध्ये किमान २५ ते ३० कंपन्या बेरोजगारांच्या मुलाखती घेऊन त्यांना तात्काळ नियुक्तीपत्रे बहाल करतील, असे सांगून आतापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या बिझनेस एक्स्पोच्या माध्यमातून १४ हजार तरुणांना रोजगार मिळवून देण्यात आल्याचेही कोयटे यांनी सांगितले. प्रा. प्रेरणा होनराव यांच्या आग्रहास्तव हा बिझनेस एक्स्पो यावेळी लातूरमध्ये होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रा. प्रेरणा होनराव, प्रा. उमाकांत होनराव, संजय शेटे यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले.

## गोविंदराव गित्ते माध्यमिक विद्यालयात सर्प विज्ञान प्रबोधन कार्यक्रम संपन्न.



पानगाव :- महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा पानगाव द्वारा आयोजित सर्प विज्ञान प्रबोधन कार्यक्रम संपन्न झाला. दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी गोविंदराव गित्ते माध्यमिक विद्यालय, पानगाव येथे संपन्न झाला.

विचार मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक एच. डी, प्रमुख वक्ते महाराष्ट्र अंनिसचे विज्ञानबोध वाहिनीचे राज्यसहकार्यवाह बाबा हलकुडे, प्रमुख पाहुणे केंद्रे एस. बी.,नागरगोजे एस.डी. आदी होते.

बाबा हलकुडे यांनी विषारी साप, निमविषारी साप, बिनविषारी साप कसा ओळखावा? कसा दिसतो? सापाचे खाद्य कोणते? साप शेतकऱ्यांचा मित्र कसा आहे? साप समोर आल्यास स्वतः चे संरक्षण कसे करावे? सर्प दंश झाल्यावर काय खबरदारी घ्यावी? सापाच्या विषाचा औषध म्हणून कसा उपयोग होतो? घर व परिसरात साप येऊ नये म्हणून काय दक्षता घ्यावी? साप व त्याबद्दलच्या समाजातील अंधश्रद्धा, साप प्रजातीचे जतन करण्याची गरज काय? सारखे दिसणारे परंतू सारखे नसणारे साप या बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या शंकाचे समाधान करण्यात आले. अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक गोकुळे एच. डी.यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलकर्णी एम. एन. यांनी केले व आभार चोले एस. आर. यांनी मानले.

यासमयी सिरसाट बी. पी., कांदे ए. एस., गव्हाणे सर, म्हेत्रे सर, लोमाजी मॅडम, स्त्रीमती शेळके पी. बी., स्त्रीमती चौरे एस. एफ. आदी शिक्षक तर चारशे पन्नास विद्यार्थी उपस्थित होते.

## वक्फ बोर्डाचा कारनामा! १५०० वर्षापूर्वीचे अख्खे गाव हडपले!

चेन्नई : वृत्तसंस्था केंद्र सरकारने गुरुवारी संसदेत वक्फ बोर्ड अधिनियमात संशोधन करणारे विधेयक सादर केले. या विधेयक सादर करताना संसदीय मंत्री किरण रिजिजू यांनी तिरुचिरापल्ली इथल्या तिरुचेंथुरई गावातील घटना सांगितली ज्या ठिकाणी हिंदू लोकसंख्या असलेल्या १५०० वर्ष जुन्या गावालाच वक्फ बोर्डाने वक्फची संपत्ती असल्याचे घोषित केले होते. ज्यांची हजारो वर्ष जुनी वडिलोपार्जित संपत्ती ती वक्फची मालमत्ता कशी झाली, हे कुणालाही कळाले नाही. वक्फ बोर्डाकडे जमिनीचा कुठलाही सबळ पुरावा नव्हता, मात्र गावावर वक्फचा मालकी हक्क होता. तामिळनाडूतील तिरुचिरापल्लीच्या तिरुचेंथुरई गावात २०२२ मध्ये पहिल्यांदा याची चर्चा झाली. कावेरी नदी किनारी जमीन असलेल्या गावातील राजगोपालनं मुलीच्या लग्नासाठी १.२ एकर जमीन विकण्याचा निर्णय घेतला. जेव्हा तो रजिस्ट्री कार्यालयात पोहोचला तेव्हा ही जमीन विकण्यासाठी वक्फ बोर्डाची एनओसी लागेल असे त्यांना सांगण्यात आले. गावच्या जमिनीवर वक्फची मालकी असल्याचे त्यांना अधिका-यांनी सांगितले. जेव्हा वाद वाढला तेव्हा वक्फ बोर्डाने रानी मंगम्मलशिवाय अनेक स्थानिक राजांनी तिरुचेंथुरईची जमीन वक्फ बोर्डाला भेट स्वरूपात दिली होती असा दावा केला.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी श्रमिक आणि दलितोद्धारासाठी जीवन समर्पित केले

## कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले

लातूर :- साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी श्रमिक व दलितांच्या समृद्धीचे स्वप्न पाहून त्यांच्या उन्नती करिता आयुष्यभर प्रयत्न केले, असे प्रतिपादन भूगोलशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. कॅप्टन बाळासाहेब गोडबोले यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. हा कार्यक्रम प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या मार्गदर्शनानुसार संपन्न झाला. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. मंतोष स्वामी, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. धोंडीबा भुरे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. सरस्वती बोरगावकर, प्रा. गोविंद पवार, प्रा. शंकर भोसले, प्रा. मारुती माळी, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रारंभी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन आणि संगीत विभागाच्यावतीने प्रा. गोविंद पवार व अजय शेलार यांनी गायलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या गीतांनी झाले. यावेळी संगीत व मराठी विभागाच्या वतीने ''अस्मिता'' या भित्तीपत्रकाचे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे



विशेषांकाचे मान्यवरांच्या शुभहस्ते विमोचन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. गोडबोले म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ विमोचक विचारांचे संस्कार होते. त्यांच्या साहित्यात कष्टकरी, दलित, उपेक्षित यांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडून समाजातला सामान्य माणूस हा त्यांचा नायक आहे. असेही ते म्हणाले. यावेळी प्रा. किसनाथ कुडके म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे कृतिशील समाज सुधारक आणि विख्यात साहित्यिक होते. त्यांच्या लेखनाला कृतीची जोड असल्यामुळे समाजप्रबोधनासाठी त्यांचे साहित्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या साहित्यातील नायक गुलामगिरीच्या विरोधात दंड थोपटून उभा राहतो आणि संघर्षाला सामोरे जातो असेही ते म्हणाले. यावेळी डॉ. रत्नाकर बेडगे, विद्यार्थिनी कु. शिवानी मुखडे यांनीही समयोचित मनोगत व्यक्त केले आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य आणि जीवन कार्य याचा पट उलगडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विश्वनाथ स्वामी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता संतोष येंचेवाड, बालाजी होनराव, अजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE